*भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय नंदनवन , नागपूर*

आयुर्वेद जनजागृती अभियान २०२३ अंतर्गत भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालयामार्फत बुधवार दिनांक २०/०९/२०२३ ला दिनचर्या व ऋतुचर्या या बद्दल मार्गदर्शन व आरोग्य पोषक असे मिलेट्स पासून मोदक तयार करणे यावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.स्पर्धेचे आयोजन स्स्वस्थवृत्त विभागातर्फे मा.प्रिन्सिपॉल डॉ. युवराज काळे सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले.उत्कृष्ट पाककले साठी प्रथम, द्वितिय व तृतीय पारितोषिक देण्यात आले.









*भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय,नंदनवन,नागपूर*

आयुष संचालनाय अंर्तगत आयुर्वेद जनजागृती अभियान २०२३ ,प्रसूति व स्त्री रोग विभाग ,भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालयामार्फत  संस्कार विद्यालय , नंदनवन येथे  दिनांक २१/०९/२०२३ रोजी पौगंडा अवस्थेतील विद्यार्थ्यांसाठी मासिक पाळी बद्दल जनजागृती , रजस्वला परिचर्या व त्याकाळात घ्यावयाचे आहार व विहार यांचे मार्गदर्शन डॉ. राजश्री शेलारे व विद्यार्थ्यांसाठी योग व ध्यान यावर मार्गदर्शन शिबिर डॉ. संध्यारानी आगरकर द्वारे घेण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्रिन्सिपॉल मा. डॉ.युवराज काळे,स्त्री रोग विभाग प्रमुख डॉ. अर्पिता शाह, वैद्यकीय अधिकारी डॉ.संगीता गिरी, स्त्री रोग विभागाच्या डॉ. जया उमाटे उपस्थितीती होती.रेखा कामले यांचे सहकार्य लाभले.









भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय , नंदनवन नागपूर

आयुष संचालनालयअंतर्गत आरोग्य जनजागृती अभियान २०२३, दिनांक २५/०९/२०२३ ला भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय येथे रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते त्याच बरोबर हिमोग्लोबिन,लिपिड प्रोफाइल व blood sugar ची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.युवराज काळे यांचा हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. खंडेलवाल MD ( Pathology) यांची होती. त्यांनी उपस्थित विद्यार्थी, रुग्ण यांना मार्गदर्शन केले.









*भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय, नंदनवन, नागपूर*

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग ,  आयुष संचालनालय ,

महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याद्वारे आयुर्वेद जनजागृती अभियाना अंतर्गत*

दि.२६/०९/२०२३* रोजी आयुर्वेद जनजागृती अभियान अंतर्गत* भव्य रॅली चे आयोजन करण्यात आले होते, राष्ट्रीय सेवा योजना व स्त्री रोग विभागातर्फे आयोजित रॅली ची सुरवात भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय नंदनवन येथून करण्यात आली, ही रॅली दर्शन कॉलनी नंदनवन येथे नेण्यात आली. तेथील PHC येथे गर्भिणी परिचर्या या विषयावर पथनाट्य करण्यात आले.

रॅली मध्ये NSS programme officer डॉ. क्षमा डोरले, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. प्रेरणा खेडकर उपस्थित होते.सुमारे १४७ विद्यार्थी उपस्थित होते.

या रॅली मध्ये स्त्री रोग विभाग प्रमुख डॉ अर्पिता शाह,तसेच नोडल अधिकारी डॉ राजश्री शेलारे तसेच डॉ जया उमाटे उपस्थित होत्या. महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक उपस्थित होते. रॅली चे समारोप महाविद्यालय येथे करण्यात आले.






